...आर.डी.जे. इमारत, ... कार्यालय,
वांद्रा [पूर्व], मुंबई ४०० ०५१.

दिनांक :- ८/जुलै/१९९५.

प्रति,

श्री. [illegible] ..................

मुख्य प्रवर्तक, मु.पो. नारायण गाव
ता.जुन्नर जिल्हा पुणे
.......सहकारी गृहनिर्माण
संस्था [प्रवर्तित]

विषय:- जमीन : मुंबई उपनगर जिल्हा
मौजे-वर्सोवा, स.नं. १६१ लगतची
खाडी जमीन अभिन्यासातील भाग क्रमांक
........७-ब......अर्थात भूखंड क्रमांक ..१...
विघ्नहर..सहकारी गृहनिर्माण संस्थेला
[नियोजित] प्रदान करण्याबाबत...

संदर्भ :-१] शासन, महसूल व वन विभागाकडील
अ] निर्णय क्रमांक एलसीएस-१०८२/१८८२
प्र.क्र. २२२/ग-४ दिनांक १२.५.१९८३
ब] निर्णय क्रमांक एलसीएस-१०९२/प्र.क्र. १७५/
ज-१ दिनांक १८.१२.१९९२
शासन पत्र
२] [illegible] दिनांक .११.१०.१९९४
३] मुंबई महानगर पालिकेचे पत्र क्रमांक डी/
पी.एल. २/एल.ओ.डी. डब्ल्यू एन/
दिनांक २९.७.१९९३

महाशय,

दिनांक २३.७.१९९४ रोजी काढलेल्या सोडतीमध्ये आपली संस्था पात्र झाल्यामुळे मुंबई उपनगर जिल्ह्यातील मौजे-वर्सोवा, तालुका-अंधेरी येथील स.नं. १६१ खाडी लगतची जमीन अभिन्यास क्रमांक ......७-ब......अर्थात भूखंड क्रमांक ...१.....चे क्षेत्र ..२५१२.१४....चौ.मी. व रस्त्यात जाणा-या जागेचा अतिरिक्त चटई निर्देशांक इत्यादीमुळे देय होणारे क्षेत्र .१३५०.४८..चौ.मी. असे एकूण ३८६२.६२. चौ.मी. क्षेत्र आपल्या नियोजित ..विघ्नहर........सहकारी

...२/-

गृहनिर्माण संस्थेला तिच्या नियत वाटपत्र ... सदस्यांची नावे ... आहे

त्या सदस्यांची रहाण्याची व्यवस्था करण्यासाठी/सदनिका बांधण्याकरीता संदर्भाधीन क्रमांक १[अ] मधील दिनांक १२.५.१९८३ चे शासनांतील तरतुदीनुसार तसेच संदर्भाधिन क्रमांक २ दिनांक २२.७.१९९३ च्या मुंबई महानगर पालिकेचे पत्र यांत दर्शविलेल्या अटी व शर्ती आणि खालील अतिरिक्त अटीवर जमीन प्रदान करण्याचा हेतू आहे.

१] संदर्भाधीन क्रमांक १ [ब] मधील दिनांक १८.१२.१९९२ च्या शासन निर्णयामधील तरतुदीप्रमाणे प्रश्नाधीन जमीनीची तात्पुरती बाजार भावाची किंमत रुपये ...११०/-... प्रती चौ.मी. मानून सवलतीची तात्पुरती कब्जा हक्काची रक्कम रुपये१४,२०११४/- [ चोवीस लक्ष वीस हजार एकशे चौदा मात्र .................. ] हे पत्र मिळाल्यापासून एक महिन्याचे आंत या कार्यालयांत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा [ ... ] या नांवाने डिमांड ड्राफ्टने भरावी.
सदर तात्पुरती सवलतीची कब्जाहक्काची रक्कम ही संस्थेला जमीनीचा ताबा देण्यासाठी अडचण निर्माण होऊ नये म्हणून संपूर्ण क्षेत्रावर निवासी प्रयोजनाची सवलतीची तात्पुरती कब्जाहक्काची रक्कम आहे. त्याचा मेळ अंतिम मुल्यांकनाचे वेळी घेण्यांत येईल. त्याकरिता संस्थेने रुपये २०/- चे मुद्रांकित पेपरवर खालीलप्रमाणे हमीपत्र सादर करावे. सदर हमीपत्र नोटरी समोर सही केलेले असावे.

"आता ठरविण्यांत आलेली तात्पुरती कब्जाहक्काची रक्कम व अंतिम मुल्यांकन ठरविण्यांत आल्यावर जर तात्पुरत्या कब्जाहक्काची किंमत अंतिम कब्जेहक्काच्या रक्कमेपेक्षा कमी असल्याचे आढळले तर तात्पुरती रक्कम व अंतिम रक्कम यातील फरकाची रक्कम जमीनीचा ताबा दिल्यापासून प्रचलित दरानुसार होणा-या १५% व्याजाच्या रक्कमेसह संस्थेकडून वसूल करण्यांत येईल. सदरची रक्कम तत्संबंधीची सूचना मिळाल्यापासून एक रकमी, एक महिन्याचे आत भरण्यांत येईल. हे संस्थेला मान्य व बंधनकारक आहे."

२]. संस्थेने जमीनीचा ताबा घेण्यापूर्वी सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या कायद्यातंर्गत नोंदी केल्याचा दाखला या कार्यालयाला सादर करावा.

३] जमीन प्रदानासाठी शासनाकडून ठरविण्यांत आलेल्या अटी व शर्ती कबूल असल्याबाबतचा करारनामा करण्यासाठी संस्थेच्या पदाधिका-यांना बोलविण्यांत येईल तेव्हा या कार्यालयांत हजर राहून सह्या कराव्यात [सोबत करारनाम्याची प्रत जोडली आहे ] तिच्या ६ प्रती लेजरपेपरवर टंकलिखीत करुन पाठवाव्यात.

४] संस्थेने कार्यकारणीची निवड केलेल्या ठरावाची प्रत या कार्यालयाला सादर करावी.

५] संस्था नोंदणीकृत करणे, करारनामा करणे इत्यादी करीता आणखी काही कालावधी लागणार असल्यामुळे संस्था वरील भूखंडाला स्वखर्चाने कुंपण घालण्यास तयार असल्यास खालील नमुन्यांत रुपये २०/- चे मुद्रांकित पेपरवर हमीपत्र [नोटरी समोर सही केलेले] या कार्यालयाला सादर केल्यास संस्थेला सदर भूखंडाला कुंपण घालण्यास परवानगी देण्याची कार्यवाही करण्यांत येईल.

...3/-

Scanned by CamScanner

/3/

"संस्था प्रस्तावीत जमिनीवर कोणताही हक्क सांगणार नाही व शासनातर्फे संस्थेला केव्हा सुध्दा काढण्यास सांगण्यात येईल तेव्हा नुकसान भरपाई न मागता ते काढून घेण्यांत येईल व ते काढण्याच्या खर्च पूर्णतया: संस्था करेल."

६] सदर भूखंड असलेला अभिन्यास मंजूर करतांना मुंबई महानगर पालिकेने घातलेल्या अटी व शर्ती संस्थेवर बंधनकारक रहातील. [याबाबत मुंबई महानगर पालिकेचे पत्र क्रमांक ई/ पीएस-२/एलओडेबल्यूएन दिनांक २९.७.१९९३ ची प्रत सोबत जोडली आहे.] सदर अट संस्थेला मान्य असल्याबाबत वरील अट क्रमांक १ मधील हमी पत्रांत नमूद करावे.

७] सदर जमिन पुन:प्रापण स्वखर्चाने करावे लागेल. भरणी करण्यासाठी त्याचा आराखडा बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या संबंधीत कार्यालयाकडून मंजूर करुन घ्यावा लागेल. त्याप्रमाणे बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या अशा पूर्व परवानगी नंतर भरणीचे काम सुरु होईल. भरणी करीत असताना महानगर पालिकेस आवश्यक असेल त्या पध्दतीने सदर भूखंडातील पाण्याचा निचरा होण्याच्या दृष्टीने गटारे इत्यादी करण्याचे बंधन संस्थेवर राहील."

वरील अटी संस्थेवर बंधनकारक रहातील. सदर बाबींची पूर्तता केल्यावर संस्थेला जमीन प्रदानाचे बाबत पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

संस्था नोंदणीकृत करणे सोईचे व्हावे म्हणून संस्थेच्या २९ सभासदांच्या नावांना मंजूरी देण्यांत येत आहे. त्यामध्ये मागासवर्गीयांसाठी दोन जागा रिक्त ठेवल्या आहेत. तथापी या कार्यालयाच्या दि.१९.५.९५च्या पत्राने संस्थेस कळविण्यांत आल्याप्रमाणे सभासदांच्या माहितीमध्ये आलेल्या त्रुटींची पूर्तता त्वरीत करावी म्हणजे संस्थेस जमीन मंजूर करण्याकामी अंतिम आदेश काढणे सोईचे होईल.

संस्थेने एकूण ३७ सभासदांच्या नावाची यादी दिली आहे. परंतु ८ सभासदांची कोणतीही माहिती प्राप्त झालेली नसल्याने मंजूरी देतेवेळी तुर्तास त्यांच्या नावांचा विचार केलेला नाही. संस्थेमध्ये २०% सभासद हे मागासवर्गीय असणे बंधनकारक असल्याने अशा सभासदांची माहिती सक्षम अधिकारी यांनी दिलेल्या जातीच्या दाखल्यासह सादर करावी म्हणजे अंतिम आदेश काढताना अडचणी येणार नाहीत.

स्थळ प्रतीवर जिल्हाधिकारी यांची सही अहे.

सही/-
जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हाकरितां.

पीएमएस.८९९५.

प्रत:- उप निबंधक सहकारी संस्था के/ष विभाग महाराष्ट्र गृहनिर्माण भवन तळ मजला, रु.नं.६९ म्हाडा, बांद्रा (पूर्व) मुंबई ५१ यांजकडे माहितीसाठी रवाना

स्थळ प्रतीवर जिल्हाधिकारी यांची सही अहे.

सही/-
जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हाकरितां.

Scanned by CamScanner

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडील पत्र क्र.१२/१३/८५-११८
दिनांक ८/६/८५ सोबतची निवारा सहकारी गृहनिर्माण
संस्था (नियोजित)च्या मंजूर सभासदांची यादी.

| अ.क्र. | सभासदाचे नांव | व्यवसाय/नोकरी | कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रुपये |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | श्री. वल्लभ ह. शेंडे | | |
| २. | " नामदेव धोंडू महानोर (विमुक्त जाती) | व्यवसाय | रु. ५०००/- |
| ३. | " जयदत्त सो. क्षीरसागर | -"- | " ५०००/- |
| ४. | " कमलराव सिताराम पाटील ( -"- ) | -"- | " ८९००/- |
| ५. | " राधाकृष्ण सर्जेराव पाटील | -"- | " ७१००/- |
| ६. | " शिवाजीराव रामचंद्र गोसाळ | -"- | " ५०००/- |
| ७. | " मामा शि. कोकरे ( -"- ) | आमदार भत्ता व इतर | " ४९२४/- |
| | | -"- | " ५०००/- |
| ८. | " वसंत शिवाजी थोरात | -"- | " ११०००/- |
| ९. | " रमेश विठ्ठल चौधरी | -"- | " ६०००/- |
| १०. | " महादेव का. पाटील | -"- | " १५०००/- |
| ११. | " रामभाऊ गेनभाऊ मोझे | -"- | " ५०००/- |
| १२. | " देवेंद्र विठ्ठल साटम | -"- | " १२५००/- |
| १३. | " सदाशिवराव दा. मंडलीक | व्यवसाय | " ४११६/- |
| १४. | " दिलीप गंगाधर सोबळ | -"- | " ४०००/- |
| १५. | " अरुण गो. मुजराधी | आमदार भत्ता व इतर | " ८०००/- |
| १६. | " दत्तात्रय उद्धू महाजन | | " ६०००/- |
| १७. | " मदन हरिश्चंद्र बाफना | व्यवसाय | " १००००/- |
| १८. | " रमेश मातापसाद दुबे | -"- | " १६०००/- |
| १९. | " शिवाजीराव अंकुश पंडित | -"- | " ९८००/- |
| २०. | " प्रकाश बाळकृष्ण यलगुलवार (अनुसूचितजाती) मागास | | " ६०००/- |
| २१. | " अशोक नामदेवराव मोहक | व्यवसाय व इतर | " १७०००/- |
| २२. | " बाळ शंकर डावखरे | -"- | " १२५०/- |
| २३. | " प्रविण प्रतापराव भोसले | -"- | " ५०००/- |
| २४. | " रामराव धोंडीबा निकम | पेन्शन व व्यवसाय | ११९६/- |
| २५. | " मर्जबान जे.के. पथावाला | व्यवसाय | " २८०००/- |
| २६. | " रामप्रसाद कदम बोर्डीकर | -"- | " ६०००/- |
| २७. | " रावसाहेब रा. पाटील | -"- | " ४०००/- |
| २८. | " नीलकंठ चिंतामण फाटक | -"- | " १५००/- |
| २९ | " नारायणराव बा. पवार | -"- | " ५०००/- |
| ३० | " मागासवर्गीय सभासदासाठी रिक्त | — | — |
| ३१. | " -"- -"- | — | — |

स्थळ प्रतीवर जिल्हाधिकारी
यांची सही असे.

[signature] ८/६/८५
जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हाकरिता.

वीएमवत.८१९५.

Scanned by CamScanner